


ISSN Print: 2394-7500
ISSN Online: 2394-5869
Impact Factor: 5.2
IJAR 2016; 2(4): 31-34
www.allresearchjournal.com
Received: 03-02-2016
Accepted: 04-03-2016

**डॉ. शेख नजीर जब्बार**
मार्गदर्शक, मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई

**प्रा. नरसिंग आबासाहेब पवार**
संशोधक, शंकररावजी चव्हाण कॉलेज ऑफ सोशल सायन्स ऍन्ड रिसर्च, रामनगर जालना

**Correspondence**
**डॉ. शेख नजीर जब्बार**
मार्गदर्शक, मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई

# दलित महिलावरील अत्याचार रू आर्थिक व शैक्षणिक सहसंबंधाचा विश्लेषणात्मक अभ्यास – संदर्भ जालना व औरंगाबाद जिल्हा

डॉ. शेख नजीर जब्बार, प्रा. नरसिंग आबासाहेब पवार

**प्रस्तावना**

भारतीय समाज हा विविध स्तरात व जातीत विखुरलेला आढळुन येतो. भारतीय समाजास जाती व्यवस्थेने विभागलेले आहे ही जाती व्यवस्था मुख्यत: दलित व सवर्ण यात विभागलेली दिसुन येते हि विभागणी जातीने लादुन दिलेल्या निर्बधामुळे दिसुन येते यात शुध्द व अशुध्द या संकल्पनाचा समावेश होतो. भारतात अस्पृश्यांना जाणीवपुर्वक दुर्लक्षित करण्यात आलेले आहे भारतात दलितांना विविध नावाने ओळखले जाते.

गोपाळ गुरु यांच्या मतानुसार "दलित व्यक्ती विविध टिकांना सामोरे जावे लागते समाजात दलितांना तुच्छ वागविले जाते या वागणुकीमागे मनुस्मृतीचा आधार घेण्यात येतो.दलित या शब्दाचा सर्वप्रथम वापर डॉ. बी आर आंबेडकर यांनी आपल्या बहिष्कृत भारत या परिष्ठित केला त्यांनी दलितांची विस्तृत व्याख्या केली (दलितांची व्याख्या) त्यांच्या मतानुसार दलित ही एक जिवनाची अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये उच्च जातीतील वर्ग सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टया उच्चवर्णिय असलेल्या व्यक्तीकडुन शोषण करण्यात येते (राजकुमार: 2000).

भारतातील बहुसंख्य दलित समाज ग्रामीण भागात स्थिरावलेला दिसुन येतो त्यापैकी काही अल्पभुदारक शेतकरी आहेत.तर बहुतेक हे ग्रामीण भागात रोज मजुर म्हणुन काम करतांना दिसुन येतात.तसेच शहरी भागातील दलित समाज हा असंघटित क्षेत्रात काम करत असताना दिसुन येतो.

अनुसूचित जाती राष्ट्रीय आयोगाच्या अहवाला नुसार दलितांची अवस्था विशेषत: अनुसूचित जाती जमातीची अवस्था अतिशय वाईट असुन बहुसंख्य दलित हे गरीब, निरक्षर आणि आधुनिक जगाशी स्पर्धा करण्यास आावश्यक असणाऱ्या कौशल्याचा अभाव दिसुन येतो हा समाजात परंपरागमत व्यवसायसात गुंतलेला दिसुन येतो. अस्पृश्यता कायदयानुसार प्रतिबंधीत असली तरी मोठया प्रमाणात ती पाळली जाते.

**दलितांचे सामाजिक जीवन**

मराठवाडयातील दलित, दलितेतरांचा भुदास होता त्यामुळे त्यांना शेतावरची पडलेली व गावातील सडलेली गलिच्द, घाणेरडी कामे करावी लागत ती त्यांनी पिढयानपिढया केली.त्यांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला मिळत नसे.मराठवाडयातील दलित गुलामगीरीचे जिणे जगत होता.गावातील चावडीची झाडझुड करणे, सारवणे, रस्ते झाडणे, मृत जनावरे ओढुन गावाबाहेर टाकणे, त्यांची निगडीत नसलेली कामे दलितांना बिनबोभाटपणे करावी लागत.अशा स्वरुपाच्या कामात जर कोणी कुचराई दाखविली तर तो शिक्षेस पात्र होई. त्या व्यक्तीस गावातुन व जातीतुन वाळीत टाकण्यात येत असे. मराठवाडयातील महार, मांग, चांभार व भंगी यांना उच्चभ्रु समाजांनी अस्पृश्य ठरविल्यामुळे त्यांचा स्पर्श अथवा सावली अमंगळ अपवित्र मानण्यात येत असे त्यांच्या स्पर्शाने विटाळ होतो अशी समजुत मराठवाडयात सर्वत्र होती. पेशवेकाळात तर शिवाशिव बारयबाट कठोरपणे पाळण्यात येई (गिमेकर: 2004).

मराठवाडयातील दलित स्त्रिया स्पृश्यांच्या घरीदारी शेतात, नानाविध प्रकारची कामे करतात कामात त्या भिंती सारवणे झाडझुड करणे, शेण काढणे, गोव-या थापने, दळणे निसणे, विटळशा व बाळंत स्त्यिांचे कपडे धुणे, उखळात धान्य कुटणे इ बारीक सारीक कामे करतांना दिसुन येतात. दलित स्त्रियां शेतातील मेहनतीचे कामे करतात निंदणे, खुरपणे, कापणी करणे, ऊस कापणे, काशा वेचणे, भुईमुगाच्या शेंगा तोडणे, खळगयातील धान्य उपसणे ही सर्व कामे दलित स्त्रियांना करावी लागतात. या कामाबददल त्यांना अल्प मजुरी देण्यात येते (गिमेकर: 2004).

### दलित महिला

भारतात दलित महिलांची स्थिती अतिशय दयनिय आहे (राणी). भारतीय समाज व्यवस्था अदयापही एखादी व्यक्ती वा समाजाचा आर्थिक व सामाजिक दर्जा ठरवत असतांना जात प्रभावी घटक ठरतो (Battula: 2011). कोणत्या समाजाने कोणता व्यवसाय करावा.त्याचे मानधन व मोबदल्याचे स्वरुप कसे असेले व ते केव्हा दयावे हे भारतीय समाज व्यवस्थेत निर्धारित केलेले.या व्यवस्थेत दलितांन सर्वात खाली व शोषण पोषक स्थिती ठेवले आहे. भारतीय राज्य घटनेने प्रत्येक व्यक्तीचा मान सन्मानाचा आदर व्हावा म्हणुन प्रत्येकाना समान संधी तसचे आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक यांच्या भरभराटीची समृध्दीची व विकासांशी निगडीत अधिकार दिलेले आहे. परंतु अदयापही हा समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात आलेला दिसत नाही. आज समाजामध्ये मोठया प्रमाणावर बलात्कार होतात त्यात दलित स्त्रियांवरील बलात्काराचे प्रमाण जास्त आहे. दलित, कष्टकरी, लोकांच्या समक्ष त्यांच्य आयाबहीणीची अब्रु लुटली जाते (लांजेवार: 2008).

### दलित महिलांचे शिक्षण

इतर समाजाच्या तुलनेत दलित समाजातील स्त्रियाची शैक्षणिक स्थिती दयनिय आहे.शिक्षणाचा अभाव तिला मान सन्मानापासुन दुर ठेवणेतर समाजात महत्वपुर्ण भुमिका पार पाडण्या पासनु वंचित ठेवण्यास दुर्बल आर्थिक स्थिती व मानसिकता कारणीभुत ठरते.दारिद्रयामुळे स्त्रि शिक्षण घेऊ शकत नाही तर निरक्षरता व न्युनगंड त्यामुळे दलित स्त्रियांत आत्मविश्वासाचा अभाव दिसुन येतो.

### आर्थिक दर्जा

निरक्षरता व दारिद्रय हे दोन घटक दलित महिलांची स्थिती दर्शविते ग्रामीण भागातील दलित महिला शेतीत मजदुर म्हणुन काम करतात. निरक्षरता, अकुशल काम रोजगारातील असातत्य इत्यादीमूळे महिलांचा आर्थिक दर्जा खालावलेला दिसुन येतो कामाचे अधिक तास, कमी वेतन, कौटांबिक हिंसाचार इतर समाजाकडुन अपमान इत्यादी बाबीना महिलाना सामोरे जाताना दिसतात.

वेतनात भेदभाव अनियमित वेतन रोजगारातील अनियमितता यामुळे दलित महिलांची स्थिती वाईट झालेली दिसुन येते. असंघटित क्षेत्रात सर्वाधिक काम करणाऱ्या महिलांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षितता जसे रजा, उपचार, पेन्शन इतर लाभ इ उपलब्ध नसणे (Jadhav: 2008). आज दलितांना सन्मानपुर्वक जीवन जगण्यासाठी पुरेशी संधीची आवश्यकता आहे (कराडे 2008.)

पारेख (1981) ग्रामीण भागातील सामाजिक अर्थिक दर्जाची वर्गवारी वैशिष्टयावर आधारीत केली ज्यात खालील बाबीचा समावेश होतो. 1 जात, 2. कुंटुंब प्रमुखाचा व्यवसाय, 3. कुंटूंब प्रमुखाचे शिक्षण, 4. कुंटूंब प्रमुखाचा सामाजिक सहभागाचा स्तर, 5. जमीन धारणा, 6. घर 7 फार्म

### उद्देश

1) पिढीत महिला व तीच्या कुटुंबातील सदस्यांच्या शैक्षणिक स्थितीचा आढावा घेण.
2) पिढीतांचे सरासरी मासीक उत्पन्न व अत्याचार यांच्या सहसंबंधाचा अभ्यास करणे.

### संशोधन पध्दती

#### अध्ययन क्षेत्र व अध्ययन विश्व

प्रस्तुत संशोधनासाठी जालना व औरंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आलेली असुन वषे 2000 ते 2011 या कालावधीतील ज्या दलित महिलांवर अत्याचार झालेला असुन त्या संदर्भात न्याय मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन ज्यांनी पोलीस स्टेशनमध्ये अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 अंतर्गत तक्रार नोंदविलेली आहे अशाच दलित महिलांचा समावेश अध्ययनात करण्यात आलेला आहे.

210 दलित महिलांसोबत अत्याच्याराच्या घटना घडलेल्या आहेत. यातुनच संशोधन अभ्यासासाठी नमुना आकार ठरविण्यात आला आहे.

### नमुना निवड

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरुन तथ्य संकलनासाठी एकुण समग्रातुन संभाव्य नमुना निवड प्रकारातील साधा यादृच्छीक नमुना निवड पध्दतीतील नियमित अंकन तंत्राचा वापर करुन 100 एककाची नमुना म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. नमुना निवड करण्याकरीता जालना व औरंगाबाद जिल्हयातील अत्याचारास बळी पडलेल्या महिलांची स्वतंत्र यादी तयार करुन नियमित अंकन पध्दतीने प्रत्येकी 50 असे एकुण 100 एककाची निवड करण्यात आली आहे.

### तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. प्राथमिक स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली आहे व याच बरोबर पिडितांच्या कुंटूंबाबरोबर चर्चा, निरीक्षण, इत्यादी माध्यमांचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला.

दुय्यम स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन संबंधीत पुस्तके, मासिके, ग्रंथ, नियतकालिके, अहवाल, प्रकाशित लेख, इंटरनेट, जाहीराती इत्यादीचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आलेले आहे.

### तथ्यांचे विश्लेषण

#### पिडितांचे शिक्षण

दलित सामाजिक शिक्षणाचे प्रमाण आज आहे. शिक्षणाचा संबंध व्यक्तीच्यास्व जागृतीशी आहे.शिक्षणाने व्यक्ती सक्षम होतात व याउलट शिक्षण कमी असेल तर व्यक्तीत ज्ञान व माहितीचा अभाव दिसुन येतो अत्याचारस बळी पडलेल्यामहिलांची शैक्षणिक स्थितीखालीलप्रमाणे आढळुन आली.

**सारणी क्रमांक 1:** पिडितांचे शिक्षण

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | प्राथमिक | 13 | 13 |
| 2. | माध्यमिक | 23 | 23 |
| 3. | उच्च माध्यमिक | 15 | 15 |
| 4. | पदवीधर | 09 | 09 |
| 5. | पदवीत्तर पदवी | 01 | 01 |
| 7. | अशिक्षित | 39 | 39 |
| | एकुण | 100 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

एकुण अत्याचारास बळी पडलेल्या महिलापैकी 14% महिलांनी प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेले आहे.तर माध्यमिक शिक्षण 24% पुर्ण केलेले आहे.यातुन असेही दिसुन येते की गावात उपलब्ध असलेल्या शैक्षणिक स्थितीनुसार महिलांचे शिक्षण

झालेले आहे. 16% महिलांनी उच्च माध्यमिक शिक्षण पुर्ण केलेले असुन इतर करीता कुंटूंबातील शिक्षण विषयक जागृती हा घटक महत्वाचा आहे.परंतु फक्त 12% महिलांनी पदवी व पदवीत्तर शिक्षण पुर्ण केले.परंतु अत्याचारीत महिलांमध्ये 34% महिलांनी कोणतेही शिक्षण घेतलेले नाही.

### कुटुंबातील सदस्यांचा शिक्षणाचा दर्जा

पिडीत महिलेच्या कुंटुंबातील शिक्षण हा त्यांचा सामाजिक दर्जा निश्चिती करीता महत्वाचा भाग मानला जातो निरक्षरच्या तुलनेत सुशिक्षित कुंटुंबचा दर्जा उंचावलेला असतो प्रस्तुत सारणीत पिडीत महिलेच्या एकुण कुंटुंबातील सदस्यांच्या शिक्षणाचा आढावा खालील तक्त्यात घेण्यात आला आहे.

**सारणी क्रमांक 2:** पिडितांच्या कुंटुंबातील एकुण सदस्यां चे शिक्षण

| अ.क्र. | विवरण | कुंटुंबातील एकुण सदस्य | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | प्राथमिक | 197 | 34.68 |
| 2. | माध्यमिक | 77 | 13.55 |
| 3. | उच्च माध्यमिक | 80 | 14.09 |
| 4. | पदवीधर | 30 | 05.28 |
| 5. | पदवीत्तर पदवी | 20 | 03.53 |
| 7. | अशिक्षित | 164 | 28.87 |
| | एकुण | 568 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

ग्रामीण भागात व सभोवताली उपलब्ध असलेल्या शेक्षणिक सुविधेवर शिक्षण अवलंबुन असलेले दिसुन येते गावातील उपलब्धतेनुसार शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे.एकुण 100 अत्याचारीत महिलेच्या कुंटुंबातील एकुण सदस्य संख्या 568 आहे पैकी 34.68% संदस्यांनी आपले प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेले आहे वा घेत आहेत.यात शिक्षण चालु असणाऱ्या मुलांमुलीचा समावेश होतो तर 13.55% सदस्यांनी माध्यमिक पर्यंत शिक्षण घेतले आहे. तसेच उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण 14.09% आहे. पुढील शिक्षण करणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे ग्रामीण भागात दलित कुंटुंबात पदवी व पदवीत्तर शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाणे अनुक्रमे 05.28% व 3.53% आहे तर 28.87% कुंटुंबातील सदस्य निरक्षर आहेत यांच्यात वयस्कर व्यक्तीचे प्रमाण सर्वाधिक आहे.

वरील सारणीचे असे विश्लेषण करता येईल की जुन्या पिडीत शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते तर नविन पिढी ही गावात वा सोईच्या ठिकाणी उपलब्ध असणाऱ्या शिक्षणापर्यंतच शिक्षण घेतले नंतर शिक्षण थांबविल्याचे लक्षात येते.

### कुंटुंबाचे उत्पन्न

शेती व शेतीशी निगडीत मजुरी हे दोन प्रमुख उत्पन्नाचे साधन ग्रामीण भागात उपलब्ध आहेत निसर्गावर आधारीत शेतीचे प्रमाण अधिक असल्यामुळे शेतीधारीत रोजगार वर्षभर उपलब्ध होईल याची शाश्वती नसते. तसेच ग्रामीण भागात मजुरीचे दर कामाच्या स्वरुपानुसार ठरत असते व प्रत्येक गावात भिन्न स्वरुपाचे दर असतात दरवर्षी हे दर बदलत जातात. भारतीय सामाजातील अनुसूचितजातीच्या संदर्भात अभ्यास केला असता या समाजाची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे विविध अभ्यासकांच्या अभ्यासातून दिसून आले आहे. कारण या जातीपूर्वीपासून अस्पृश्य असल्यामुळे त्यांना धनसंचय करण्याचा अधिकार नव्हता. केवळउच्चवर्णियांची सेवा करणे व त्या मोबदल्यात मिळेल ते अन्न घेणे एवढेच काम याजातीकडे होते. उत्पन्न मिळवून आर्थिक प्रगती होण्यासाठी साधनसंपत्तीची कमतरताअसल्यामुळे आजही हा समाज आर्थिक विवंचनेमध्ये जीवन जगत आहे. पिडीत कुंटुंबाचे सरासरी महिन्याचे उत्पन्न खालील सारणीत दर्शविले आहेत.

**सारणी क्रमांक 3:** कुंटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न

| अ.क्र. | विवरण | | वारंवारीता |
|---|---|---|---|
| 1 | 1000 पेक्षा कमी | 10 | 10 |
| 2 | 1001-2000 | 15 | 15 |
| 3 | 2001-3000 | 11 | 11 |
| 4 | 3001-4000 | 14 | 14 |
| 5 | 4001- 5000 | 11 | 11 |
| 6 | 5001-6000 | 16 | 16 |
| 7 | 6001-7000 | 10 | 10 |
| 8 | 7001-8000 | 08 | 08 |
| 9 | 8001-9000 | 02 | 02 |
| 10 | 9001- पेक्षा जास्त | 03 | 03 |
| एकुण | | 100 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

पिडीत कुंटूंबापैकी 10 कुंटूंब असे आहेत की त्यांचे मासिक उत्पन्न हे 1000 रु पेक्षाही कमी आहेत तर 1001 ते 2000 मासिक उत्पन्न असणारी कुंटुंबे साधारणत: 15 आहेत. साधारणत: 50% कुंटुंबे ही 5000 रुपये मासिक उत्पन्न असणारे आहेत या कुंटूंबाचा आकार छोटा असुन साधारणत: 2 ते 3 व्यक्ती हया कमावणाऱ्या आहेत तर 40% कुंटूंबे ही 5001 ते 7000 रुपये प्रतिमाह उत्पन्न असणारी आहेत तर फक्त 5% कुंटुंबे ही 8001 पेक्षा अधिक उत्पन्न असणारे आहेत.

वरील सारणीवरुन असा निष्कर्ष काढता येईल की कुंटूंबाचे उत्पन्न कुंटुंबातील कमावत्या व्यक्ती व रोजगाराची उपलब्धता यावर अवलंबुन आहे तसेच शेती व त्याचे स्वरुप निसर्गाची साथ बाजारभाव, शास्त्रीय शेती शेतीतील आधुनिकीकरण यांचा पण संबंध ग्रामीण भागातील रोजगार व उत्पन्न यांच्याशी आहे.

### निष्कर्ष

पिडीतांच्या शिक्षणाचा विश्लेषण केले असता असे निदर्शनास येते की, अत्याचारास सुशिक्षीत व अशिक्षित महिला बळी पडलेल्या दिसून येतात. सर्वाधिक अशिक्षीत महिला अत्यचारास बळी पडलेल्या दिसून येतात. त्यांचे प्रमाण 39% आहे. शिक्षण व अत्याचार यांचा सहसंबंध येथे दिसून येतो. उच्चशिक्षीत महिलांवर अत्याचार कमी झालेले दिसून येते तर प्राथर्मीक आणि माध्यमिक स्थरातवर शिक्षण पूर्ण केलेल्या महिलावरही अत्याचार झालेले आहे.

पिडीत महिलांच्या कुटुंबातील सदस्यांचा विचार केला असता असे दिसून येते की, प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या कुटुंबातील सदस्यावर अत्याचाराचे प्रमाण अधिक आहे. तर त्या खालोखाल 28.87% अशिक्षीत कुटुंबातील सदस्यावर अत्याचार झालेले आहे.

आर्थिक स्थिती व अत्याचार यांच्या सहसंबंधाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, अत्याचारास बळी पडलेल्या सर्वाधीक महिलांचे मासिक उत्पन्न रूपये 5000 च्या आत आहे तर 8000 पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील महिलावर अत्याचाराचे प्रमाण कमी आहे.

**संदर्भ**


1. Dalit culture Perspective from below social action Vol 50 Janeuary-March 2000 Page 16
2. Jadhav A S ( Dalit Among Dalit : S.C. & S.T. Woman) in P.G. Jogdand O.P Cit Page 181
3. Mittal Mukta, (2010), "Dait Women in India (Survial & current Dilemm) ", New Delhi, Arise Publisher P No. 33.
4. गिमेकर परशुराम, (2004), "मराठवाडयातील दलितांचे लोकसाहित्य", औरंगाबाद, कैलाश पब्लीकेशन, पृ. क्र. 13
5. लांजेवार ज्योती, (2008), "फुले- आंबेडकर आणि स्त्रि मुक्ती चळवळ", नागपुर, संकेत प्रकाशन पृ.क्र. 85